रविवार दि.८ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# ...अखेर राज्यसरकारचे तुपकरांना बैठकीचे निमंत्रण

# उपमुख्यमंत्री अजित पवारांसोबत ११ सप्टेंबरला बैठक

## पालकमंत्री ना.दिलीप वळसे पाटील व कृषि ना.धनंजय मुंडे यांची मध्यस्थी

## रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन तूर्त स्थगित;शेतकरी महिलेच्या हस्ते सोडले उपोषण

## उद्याचे आंदोलन तूर्त स्थगित;११ सप्टेंबरच्या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यास १२ सप्टेंबर पासून आक्रमकपणे रस्त्यावर उतरणार-तुपकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा | प्रतिनिधी**

सोयाबीन-कापूस दरवाढ, पिकविमा,अतिवृष्टीची १००% नुकसान भरपाई, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, जंगली जनावरांपासून सरंक्षणासाठी शेतीला मजबूत कंपाऊंड, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रविकांत तुपकर यांनी सिंदखेडराजात गेल्या चार दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले हते. दरम्यान शासनाने या आंदोलनाची दखल घेतली असून राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी मागण्यासंदर्भात ११ सप्टेंबर रोजी मुंबई येथे बैठक बोलावली आहे. ना.पवार व संबंधित विभागाचे मंत्री अधिकारी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या बैठकीला रविकांत तुपकर यांना चर्चेसाठी बोलावण्यात आले असून प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे पत्र उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी रविकांत तुपकरांना बैठकीच्या निमंत्रणाचे लेखी पत्र दिले. जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दिलीप वळसे पाटील व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी या बैठकीसाठी मध्यस्थी केली आहे. शासनाने आंदोलनाची दखल घेऊन तुपकरांना चर्चेसाठी बोलाविले आहे, त्यामुळे आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती शेतकरी व सहकाऱ्यांनी केल्यानंतर रविकांत तुपकर यांनी आंदोलन स्थळी उपस्थित महिलांच्या हस्ते व माँसाहेब जिजाऊ चरणी नतमस्तक होत आपले अन्नत्याग आंदोलन तूर्त स्थगित केले. बैठकीत काय निर्णय होतो हे पाहून पुढील दिशा ठरवू, जर ठोस निर्णय झाले नाही तर राज्यभर आक्रमकपणे पुन्हा रस्त्यावर उतरू, असे रविकांत तुपकर यांनी सांगितले.



मातृतीर्थ सिंदखेड राजात शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे आंदोलन गेल्या ४ दिवसांपासून सुरू होते. सोयाबीन - कापसाची दरवाढ, पीक विम्याचा प्रश्न, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, जंगली जनावरांपासून शेतीपिकांचे रक्षण यासह विविध मुद्यांवर तुपकरांनी हे आंदोलन सुरू होते. आज ७ सप्टेंबर रोजी आंदोलनाच्या चौथ्या दिवशी जिल्ह्यातल्या शेकडो गावात व राज्यातील हजारो गावांत तुपकर यांच्या समर्थनार्थ ग्रामपंचायतचे ठराव घेण्यात आले. रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला आमचा जाहीर पाठिंबा असून शासनाने शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, असे ठराव विविध ग्रामपंचायतीने घेतले आहेत. तुपकरांच्या आंदोलनाचा चौथा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली असतांनाही सरकार या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असल्याने कार्यकर्ते आणि शेतकरी आक्रमक झाले होते. ८ सप्टेंबर रोजी रास्तारोको आंदोलन असल्याने परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली होती. दरम्यान आज सायंकाळी शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी प्रा. खडसे यांनी रविकांत तुपकर यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून खुद्द उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी आंदोलनाची दखल घेतली असून शेतकऱ्यांच्या मागण्या आणि समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलावल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी रविकांत तुपकर यांना ११ सप्टेंबर रोजी मुंबई येथे बैठकीसाठी बोलावले आहे. या बैठकीचे लेखी निमंत्रण जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी खडसे यांनी रविकांत तुपकर यांना दिले. शासनाच्या वतीने शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र बैठक बोलावली हे आंदोलनाच्या आणि शेतकऱ्यांच्या एकजुटीचे यश आहे. केवळ आंदोलन करणे आणि कायदा हाती घेणे हा आपला उद्देश नसून शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या न्याय हक्क मिळवून देणे हा आपला उद्देश असल्याने आपण उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीचे निमंत्रण स्वीकारून आपल्या आंदोलन तुर्तास स्थगित करत असल्याचे रविकांत तुपकर यांनी सांगितले. जिजाऊंच्या या पावनभूमीत आंदोलन स्थळी उपस्थित असलेल्या माय- माऊलींच्या हस्ते दूध घेऊन तुपकरांनी आपले अन्यत्याग आंदोलन तोडले. ११ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत काय निर्णय होतात आणि कोणत्या कोणत्या मागण्या मार्गे लागतात हे पाहूनच पुढील निर्णय घेऊ तोपर्यंत सर्व कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी शांत रहावे, जर ठोस निर्णय झाले नाही तर आक्रमकपणे रस्त्यावर उतरू असे रविकांत तुपकर यांनी सांगितले.

### आ.डॉ.राजेंद्र शिंगणे व विविध नेत्यांची आंदोलन स्थळी भेट

**राज्याचे माजी मंत्री तथा सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन रविकांत तुपकर यांच्याशी चर्चा केली. रविकांत तुपकर यांनी केलेल्या मागण्या ह्या रास्त असून याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्याशी चर्चा करू असे, आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी यावेळी बोलतांना सांगितले. रविकांत तुपकर राज्यातील शेतकऱ्यांचा आवाज आहे, त्यामुळे त्यांनी प्रकृतीची काळजी घ्यावी, असा सल्ला देखील आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिला. तसेच माजी आमदार तताराम कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रसेनजीत पाटील, नरेश शेळके,ज्योतीताई खेडेकर, प्रा.नरेश बोडखे, यांनी आंदोलन स्थळी पोचून रविकांत तुपकर यांची भेट घेतली.**

# कवठे यमाई गावाच्या शेतकरी कुटुंबातील साक्षी पळसकरची पोलीस पदाला गवसणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील कवठे यमाई गावात असणारे शेतकरी कैलास पळसकर यांच्या कुटूंबात जन्मलेल्या साक्षीने लहान पणापासून शासकीय नोकरी करण्याचे स्वप्न उराशी बाळगले असताना अनेक समस्यांवर मात करून तिने ते सत्यात उतरवले.नुकतीच ठाणे शहर पोलीस निवड चाचणीत साक्षीने शारिरीक चाचणीत ४१ गुण तर लेखी परिक्षेत ९० गुण मिळवत पोलीस पदाला गवसणी घातली आहे.



कवठे येमाई येथील स्थायिक शेतकरी कुटूंबातील साक्षी कैलास पळसकर हिचे चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले.तर माध्यमिक शिक्षण गावातील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये पुर्ण केले.पुढील शिक्षणाची फारशी सुविधा नसताना तिने उच्चमाध्यमिक शिक्षण मुखईच्या अश्रमशाळेत तर निघोज (ता.पारनेर ) येथील मुलिकादेवी महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण घेत शासकिय नोकरी करण्याचे ध्येय निश्चित केले होते.वडिलांचेही चांगले शिक्षण झालेले मात्र वेळोवेळी प्रयत्न करूनही त्यांना पोलीस होता आले नाही तेच स्वप्न जणू साक्षीने पोलीस होऊन पूर्ण केले.मुलीच्या जिद्दीचे समाजाने, गावाने तोंड भरून कौतुक केले.मिळालेल्या यशाने साक्षीचाही आनंद गगनात मावेनासा झाला होता तर उत्तरोत्तर अशीच यशाची शिखरे सर करणार असल्याचे साक्षीने सांगितले.गरीब शेतकरी कुटूंबातील अशा या जिद्दी साक्षीची कहाणी इतरांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

# बीएमएस,बिएचएमएस आयुष विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**

सरकार आणि एनसीआयएसएम व एनसीएच कॉन्सीलद्वारे बीएएमएस, बिएचएमएस बीयुएमएस आयुष विद्यार्थ्यांना कुठलिही पूर्वकल्पना न देता २० डिसेंबर २०२३ व २९ नोव्हेंबर २०२३ पासून अचानक नेक्स्ट राष्ट्रीय निर्गमण चाचणी छर- ींळेपरश्र एुळीीं ढशीीं परीक्षा लागू करण्याचे जाहिर करण्यात आले. त्यानूसार २० डिसेंबर २०२३ २९ नोव्हेंबर २०२३ चया नंतर जे विद्यार्थी इंटर्नशीप करणार आहेत त्यांच्यासाठी ही परीक्षा अनिवार्य करण्यात आली. ही परिक्षा पात्र झाल्याशिवाय वैद्यकीय परवाना दिला जाणार नव्हता. देशभरात मागील ९ महिन्यांपासून आयुष विद्यार्थ्यांनी या परिक्षेचा विरोध केला आहे. वैद्यकिय विद्यार्थी असंख्य आंदोलन केली. अनेक मंत्री खासदार, आमदार या संदर्भात विद्यार्थ्यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार केंद्रीय आयुषमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी या परिक्षेसंदर्भात कमिटी स्थापन करुन विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात आला. पत्रकार परिषदेमध्ये केंद्रीय आयुषमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी सदरील नेक्स्ट परिक्षा २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून लागु करण्यात आली आहे असे जाहीर केले. या लढ्यात महाराष्ट्रातुन वैद्यकीय विद्यार्थी डॉ. मंगेश भस्के, डॉ. सुमित चांदणे, गोविंद अंबलकर (गोरठेकर), व्यंकटेश पाटील वझरगेकर, गोपाल राऊत, गोपाल भेंडेकर, ज्ञानेश्वर शिंदे, सुधीर मुडूमडीगेला, हरिस वकार, मन्मथ शिंदे, ओंकार पानसरे आदी विद्यार्थ्यांनी ना. जाधव यांचे आभार मानले.

### महायुतीच्या सर्व नेत्यांना सद्बुद्धी द्या-छगन भुजबळ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

एकमेकांविरोधात वादग्रस्त विधाने करणाऱ्या सत्ताधारी महायुतीच्या सर्व नेत्यांना सद्बुद्धी द्या, असे साकडे आज राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी विघ्नहर्त्या गणेशाला घातले. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास सर्वच पक्षांचा विरोध असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.गत काही दिवसांपासून सत्ताधारी महायुतीतील घटकपक्षांचे नेते एकमेकांविरोधात टीका करत आहेत.

### चारोळी

एक तरी अशी जागा असावी
जिथं मन हलकं होईल
दु:खाला वाट मोकळी अन
मन मोरपीसी होऊन जाईल.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## पत्रकारांशी उद्धट भाषेत बोलणाऱ्या

# ठाणेदार करेवाड यांचेवर कारवाई करण्यासाठी पत्रकारांची जिल्हा पोलीस अधीक्षककडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त शांतता समितीच्या बैठकीमध्ये साखरखेर्डा ठाणेदारांनी पत्रकाराशी अरेरावी आणि उद्धटपणाची भाषा वापरून अपमानित केले यासंदर्भात तात्काळ चौकशी करून ठाणेदार करेवाड यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी सिंदखेडराजा तालुक्यातील पत्रकार संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे



या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की. ०६ सप्टेंबर रोजी मलकापूर पांग्रा तालुका सिं.राजा येथे ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी साखरखेर्डा पो.स्टे.चे ठाणेदार गजानन करेवाड यांनी त्या ठिकाणी चर्चा करतांना चे पत्रकार फकीरा पठाण यांना एकेरी संबोधून अत्यंत खालच्या पातळीवर अरेरावीची आणि उद्धटपणाची भाषा वापरून गावातील व्यक्तींसमोर अपमानीत केले. यासंदर्भात पत्रकारांनी त्यांच्याशी तुमचं हे बोलणं बरोबर नव्हतं असे सांगीतले असता त्यांनी आमचे म्हणणे न ऐकता, तुम्हाला काय करायचे ते करून घ्या व मी तकारीला घाबरत नाही असे सांगितले त्यामुळे सदर ठाणे दारावर तात्काळ कठोर कारवाई करावी अशी मागणी पत्रकार दीपक नागरे भगवान साळवे वसीम शेख कासिम शेख सचिन खंडारे विठ्ठल देशमुख बाजीराव वाघ समीर कुरेशी वसीम शेख अमोल साळवे पवन मगर रमेश कोंडाणे गुलशेर शेख इसाक कुरेशी गजानन काळुसे फिरोज शेख भगवान नागरे अशोक इंगळे गणेश पंजरकर अफरोज शेख यांनी केली आहे.




वर्ड व्हिजन संस्थेचे संस्थापक प्रा. नागेश हुलावले, आम्ही मुंबईकर सा.वृत्तपत्राचे संपादक श्री. प्रमोद सुर्यवंशी, काव्यसंस्था पुणे यांचे संपादक श्री. योगेश हरणे यांच्या सौजन्याने सौ. सुजाता मोहन जाधव यांना त्यांच्या शैक्षणिक,साहित्यिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन साहित्यरत्न प्रजासत्ताक अमृत गौरव हा पुरस्कार प्रदान करून गौरवान्कित केले गेले. मुंबई, बांद्रा पश्चिम नॅशनल लायब्ररी सभागृह, स्वामी विवेकानंद रोड येथे २५ ऑगस्ट २०२४ रोजी विख्यात साहित्यिक व पत्रकार बाळासाहेब तोरसकर यांच्या उपस्थितीत व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# सणासुदीच्या काळात बीड शहरातील नागरी समस्यांचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सोडवावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । वार्ताहर**

शहरात नागरी समस्यांचा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. रस्ते, अस्वच्छता आणि पाणी पुरवठ्यातील विस्कळीतपणामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. जिल्हा प्रशासनाकडून याकडे लक्ष देण्यात यावे यासाठी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी दि. ०६ ऑगस्ट आणि २७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन नगरपालिका प्रशासनास सूचना करणे बाबत कळवले होते .परंतु अद्याप पर्यंत जिल्हा प्रशासनाकडून सकारात्मक पाऊल उचलण्यात आले नसल्याने बीड शहरातील कोलमडलेल्या मूलभूत सोयी सुविधा सणासुदीच्या काळात तातडीने सुधारणा करावी अशा आशयाचे पत्र आज पुन्हा मा.जिल्हाधिकाऱ्यांना शिवसंग्रामच्या शिष्टमंडळाने दिले आहे.

शहरातील समस्य जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडताना नगर पालिकेच्या दुर्लक्षीतपणाकडेही जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले आहे. शहरातील रस्त्यांची दयनिय अवस्था, शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेचा प्रश्न, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अस्वच्छते मुळे शहरात पसरलेले साथीच्या रोग , समाधानकारक पाऊस होवून देखील भेडसावत असलेला पाण्याची समस्या याबाबतची सर्व वास्तवता जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली याबाबत जिल्हाधिकारी बीड यांनी संबंधित यंत्रणेस सूचना देऊनही नगरपालिका प्रशासनाकडून दखल घेण्यात आलेली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. तसेच सद्यस्थितीत बीड बसस्थानकाचे काम अतिशय संथगतीने चालू आहे. पावसाने याभागात मोठ्या प्रमाणात चिखल झालेला आहे. गणेशोत्सवनिमित्त भाविकांची वर्दळ वाढणार असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून किमान तात्पुरत्या स्वरूपात उपाय योजना करून प्रवाशांची गैरसोय दूर करण्यात



यावी.तसेच येत्या काही दिवसात गणपती व महालक्ष्मी निमित्त शहरातील आबालवृद्ध महिला पुरुष शहरात अनेक कामानिमित्त बाहेर पडणार आहेत. त्यामुळे शहरातील असुविधेमुळे त्यांना विनाकारण त्रास होऊ नये यासाठी किमान गणपती आगमनापूर्वी शहरातील समस्येबाबत यथोचित कार्यवाही करण्यात यावी.असेही दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. दिलेल्या निवेदना संदर्भात ठोस कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने शिवसंग्रामच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी शिवसंग्रामच्या वतीने देण्यात आला.याप्रसंगी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे,बीड शहराध्यक्ष सुहास पाटील, खरेदी-विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे , महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ॲड. मनिषाताई कुपकर, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, मागदे सर,परिवहन आघाडीचे जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र कुटे,अल्पसंख्यांक आघाडीचे नेते शेख अजहर भाई,नामदेव धांडे, हरिश्चंद्र ठोसर, संदीप नवले, नितीन बुधनर,देविदास मेंगडे, ऋषिकेश बुधनर, गहिनीनाथ मस्के व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## मानोली येथे युगात्मा शरद जोशी यांच्या जयंती निमित्त अभिवादन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मानोली येथे स्व, युगात्मा शरद जोशी यांची ८९ वी जयंती साजरी करण्यात आली शरद जोशी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी शरद जोशी यांनी केलेल्या कार्यावर व जिवन चरित्र्यावर चर्चा करूनविचार मंथन करण्यात आले.त्या नंतर तंत्रज्ञानातून शेती कशी करायची व सामान्य दैनंदिन जीवनात व्यक्तीने कसे राहावे हे रामभाऊ शिंदे यांनी यावेळी मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी पंडितराव शिंदे रामभाऊ शिंदे मदन महाराज शिंदे ज्ञानोबा मांडे गणेश घाडगे भागवत शिंदे सुदामराव शिंदे कुलदीप सुरवसे दत्ता मांडे भारत मांडे अशोक शिंदे वसंत मांडे यांनी शरद जोशी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले यावेळी मानोली येथील शेतकरी व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## के.के.एम.महाविद्यालया मध्ये चक्रधर स्वामी अवतार दिवसव डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

आज श्री चक्रधर स्वामी अवतार दिवस व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून के.के.एम महाविद्यालयात साजरा करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, आज दि. ५/०९/२४ रोजी के. के. एम.महाविद्यालयात शिक्षक दिन आणि श्री चक्रधर स्वामी अवतार दिवस साजरा करण्यात आला. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे उपस्थित होते.तर अध्यक्षीय समारोप डॉ. भास्कर मुंडे यांनी केले. संयोजक डॉ. विनायक जाधव यांनी प्रास्ताविक केले तर आभार डॉ. कन्हैयालाल पाटोळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के.जी. हुगे, पर्यवेक्षक श्री.अनिल कापसे, मूल्य शिक्षण समिती प्रमुख डॉ.पंडित लांडगे आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व बहुसंख्य कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

## सात एकर वरील कापूस उध्वस्त झाल्याने शेतकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू तालुक्यातील हिस्सी येथील शेतमजूर शेतकऱ्याचा आपल्या शेतातील सात एकर वरील कापूस उध्वस्त झाल्याने हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

याबद्दल सविस्तर माहिती अशी की सेलू तालुक्यातील हिस्सी येथील शेतमजूर शेतकरी विजय कचरूबा कसाब या तरुण शेतकऱ्यांनी दुसऱ्याचे सात एकर शेत भाड्याने शेती करण्यासाठी घेतले होते स्वतः शेतमजूर भूमी येण असून दुसऱ्याची जमीन ठोक्याने केली होती त्यामध्ये सात एकर वर पूर्ण कापूस पिकाचे उत्पादन घेतले होते कापूस एक चांगल्या पद्धतीने आलेली होते पण हे अतिवृष्टी पावसाने होत्याची नव्हती झाली ७ एकर वरील संपूर्ण पीक उध्वस्त झाल्याने विजय अस्वस्थ झाला व घरी येऊन चिंता करू लागला तो आपल्या पत्नीला मनाला आपण केलेली ठोक्याची



जमीन वरील कापसाचे पीक आपल्या हातून गेले आता आपल्या हाती काहीच लागणार नाही या चिंतेने त्याच्या हृदयाची ठोके वाढायला लागली छातीमध्ये कळा येऊ लागल्याने तो खाजगी रुग्णालयामध्ये गेला रुग्णालयामध्ये दाखल होताच त्याचा जीव गेला असे डॉक्टरांनी मृत घोषित केले विजय हा घरचा करता माणूस असल्यामुळे त्याच्या घरावर दुःखाचा डोंगर कोसळला त्याचे वय ३८ वर्षे होते त्यांच्या पश्चात आई पत्नी तीन मुली एक मुलगा व भाऊ असा त्याचा परिवार आहे

## दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात दहीहंडी उत्सव साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी श्रीकृष्णजन्माष्टमी निमित्ताने गोपाळ काला व दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रवचनकार, ह.भ.प श्री.निकम गुरुजी यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. दरम्यान आई वडील हेच श्रेष्ठ दैवत असल्याचे प्रतिपादन श्री निकम गुरुजी यांनी केले.कार्यक्रमासाठी प्राचार्य श्री. एस.बी.गारडे, श्री खांडेभराड सर, तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या. प्रवचन संपन्न झाल्यानंतर गोविंदाच्या पथकाद्वारे दहीहंडी फोडण्यात आली. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांसह प्राचार्य, शिक्षक-शिक्षिका यांनी सहभागी होऊन आनंद घेतला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन इंग्रजी विषयाचे जेष्ठ आणि तज्ज्ञ प्राध्यापक श्री.एच.आर. बिडवे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शारीरिक शिक्षक श्री. आर. एल. राठोड सर यांनी केले. विद्यार्थ्यांना प्रसादाचे वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पुण्यातील गुन्हेगारीला सत्ताधाऱ्यांचा छुपा पाठिंबा आहे का?:प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील प्रमुख शहारापैकी एक असलेल्या पुण्यामध्ये खळबळजनक घटना घडली आहे. शहरात भर चौकात गोळ्या घालून एकाची हत्या करण्यात आली आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीला राज्यातील सत्ताधाऱ्यांचा छुपा पाठिंबा आहे का? असा सवाल त्यांनी केला.

आपल्या एक्स हँडलवरून जयंत पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. यावर त्यांनी लिहिले की, पुणे शहरात भर चौकात एका व्यक्तीची गोळ्या घालून आणि कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली. गेल्या काही वर्षांत पुण्यातील टोळी युध्दाने परिसीमा गाठली आहे. पुण्यातील अंमली पदार्थांचे साठे सापडण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. विद्येचे माहेरघर असणारे पुणे सत्ताधारी आणि यंत्रणेच्या नाकर्तेपणामुळे देशभर बदनाम होऊ लागले आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीला राज्यातील सत्ताधाऱ्यांचा छुपा पाठिंबा आहे का?'

राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर



यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पिस्तुलातून गोळीबार केला, तर काही तरुणांनी धारदार कोयत्याने हल्ला केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. घर व दुकानाच्या कौटुंबिक वादातून आंदेकर यांच्या बहिणीचा पती गणेश कोमकरने साथीदारांसह त्यांच्यावर गोळीबार केल्याचा संशय आहे. वनराज आंदेकर हे रविवारी रात्री ८.३० च्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्या वेळी त्यांच्यावर दुचाकीवर आलेल्या हल्लेखोरांनी पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या घटनेपूर्वी डोके तालीम परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता.

## साक्षरता

लोकनेता न्यूज नेटवर्क

साक्षरता दिन । आठ सप्टेंबर ।
करू या साक्षर । निरक्षर ।। १ ।।

राष्ट्र साक्षरता । मिशन हे दारी ।
साक्षरता वारी । दारोदारी ।। २ ।।

असे निरक्षर । निर्मूलन करा ।
साक्षरता वारा । चोहिकडे ।। ३ ।।

सक्तिचे शिक्षण । असे प्राथमिक ।
साक्षर अधिक । भारतात ।। ४ ।।

साक्षरता वृद्धी । विकासात भर ।
प्रगतीची धार । भारतात ।। ५ ।।

साक्षर सप्ताह । साजरा करू या ।
जाणीव देऊ या । निरक्षरा ।। ६ ।।

**समाजभूषण पुरस्कार प्राप्त अभंगकार**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर,अमरावती.**

## शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्याकडे खुर्द पांगरीच्या ग्रामस्थांनी मांडली कैफियत

### अतिवृष्टीग्रस्तांना दिला दिलासा ; तात्काळ निवाऱ्याची व्यवस्था करण्याचा दिला शब्द

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

शिवसेना नेते आ. आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार संजय जाधव यांनी मंठा तालुक्यातील पूर परिस्थितीची पाहणी केली. तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले. अनेकांचे संसार उघड्यावर पडले. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बुधवार ता.४ रोजी शिवसेना नेते आ. आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, विरोधीपक्ष नेते ना. अंबादास दानवे, खा. संजय जाधव यांनी खुर्द पांगरी येथे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून नैसर्गिक आपत्तीमध्ये आम्ही आपल्या सोबत आहोत असा दिलासा दिला. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना नेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे, भास्कर आंबेकर, संजय लाखे पाटील, अनिरुद्ध खोतकर, गोपाळराव बोराडे, नितीन जेथलिया, ड. पंकज बोराडे, कल्याणराव बोराडे, अंकुशराव अवचार, बबनराव गणगे, अजय अवचार, सुदर्शन सोळंके, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार सोनाली जोंधळे यांच्यासह



शेतकरी, ग्रामस्थ, महिला भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या. यावेळी ग्रामस्थांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती दिली. ग्रामस्थांना घरदार सोडावे लागले, लेकराबाळांना सोबत घेऊन सुरक्षित ठिकाणी जावे लागले. असे सांगताना ग्रामस्थांना अक्षरशा रडू कोसळले. शेती पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले तर घरात पाणी गेल्यामुळे अन्नधान्य वाहून गेले अशी कैफियत ग्रामस्थांनी मांडली. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी ग्रामस्थांच्या निवाऱ्याची तात्काळ व्यवस्था करणार असल्याचे सांगून गावातील पुलाचा व रस्त्याचा प्रश्नही मार्गी लावणार असल्याचे सांगितले. यावेळी शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, शेतकरी ग्रामस्थ व महिला भगिनी उपस्थित होत्या.

# वासुंदे गावातील खडी क्रेशवर हजारो ओव्हरलोड गाड्या भरतात मग बारामतीच्या आरटीओंना का दिसत नाही

## अर्ज द्या मगच कारवाई करू-इन्स्पेक्टर पुनसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे






वासुंदे ता.दौंड येथे एकूण १८ खडी क्रेशर चालू असून या ठिकाणी अतिशय अंदा-धुंद कारभार खडी क्रेशर मालकांचा चालू आहे.हजारो-लाखो ब्रास खडी,कच,मोठ्या खोल प्रमाणात उत्खनन करून नियमांची पायमल्ली करत वाहतूक करून विक्री केली जात आहे.

परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात गाड्या खडी,कच,डस्ट भरून ओहरलोड वाहतूक दिवसा ढवळ्या पाटस-बारामती पालखी महामार्गावरून होत आहे.ही वाहतूक बारामतीचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती येथील अधिकाऱ्यांना का दिसत नाहीत. यांच्यावर ओव्हरलोड ची कारवाई का होत नाही.असे अनेक प्रश्न नागरिकांना पडले आहेत.याबाबत उपप्रादेशिक परीवहन दौंड विभागाचे पुनसे यांना संपर्क केला असता,ते म्हणाले की तुमच्या सांगण्यावर आम्ही कारवाई करणार नाही.तुम्हाला आमच्या ऑफिसला लेखी अर्ज करावा लागेल,मगच आम्ही कारवाई करू,असे उर्मट उत्तर पुनसे यांनी दिले,मग हा प्रश्न पडतो की इतर गाड्यांवर कारवाई होते ती अर्ज देऊनच होते का?असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. या बाबत उपप्रादेशिक परीवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की नक्की आम्ही या ठिकाणी कारवाई करू परंतु सध्या आमच्याकडे कर्मचारी कमी आहे.त्यामुळे कारवाई करण्यास अडचणी येत आहेत.

खणीकर्म शाखा जिल्हाधिकारी पुणे,तहसील दौंड,मंडल अधिकारी,गावकामगार तलाठी वासुंदे येथील कोणीही काहीच कारवाई करत नसल्यामुळे संबंधित अधिकारी यांना हताशी धरून आर्थिक देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात होत आहे.अशी वासुंदे परीसरात जोरदार चर्चा सुरु आहे. या ठिकाणी ज्यादा उत्खनन करून लाखो रुपयांची माया खडी क्रेशर मालकांनी कमावली आहे.तरी महसूल प्रशासन कसलीही कारवाई करत नाहीत,असा आरोप देखील हनुमंत जांबले यांनी केला आहे. त्यामुळे संबधित अधिकारी,खडी क्रेशर मालक यांच्या संपत्तीची चौकशी झाली पाहिजे. तसेच शेळके कंट्रक्शन यांचा खडी क्रेशर बंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने आदेश दिला असून तरीदेखील हा खडी क्रेशर राज-रोस दिवसाढवळ्या चालू आहे.याकडे महसूल प्रशासन मुद्दाम डोळेझाक करत आहे.कुठलीही कारवाई करत नाहीत,असे जांबले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

याच ठिकाणी काही क्रेशर च्या प्लॅन्ट वरून अतिउच्च दाब २२० के,व्ही बारामती ते कुरकुंभ आणि २२० के,व्ही कुरकुंभ ते शिर्सुफळ विज वाहिनी गेलेली आहे.या विज वाहिनीच्या क्रमांक १ ते २,३५ मिटर पृष्ठभागालगत कोणतेही काम,उत्खनन करण्यास परवानगी नसते. तरी देखील मनोर्याच्या लगतच उत्खनन झाले आहे. आणि या विद्युत मनोऱ्याला धोका निर्माण झाला आहे.असे महापारेषाण उपकार्यकारी अभियंता बारामती यांनी देखील कळविले आहे.तरी देखील येथे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरूच आहे.त्यामुळे येथे मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे.तशी नोटीस महापारेषाण विभाग बारामती यांनी संबंधित खडी क्रेशर मालकाला दिली असून तरी देखील हा क्रेशर अजूनही चालूच आहे.आणि येथे मोठे बोर ब्लास्टिंग देखील केले जात आहे.असे हनुमंत जांबले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## साखरा येथे सशक्तिकरण मन की बात

# धन्यवाद मोदीजी सरल प फ्रेंडस ऑफ बीजेपी व आगामी कार्यक्रम संपन्न

## कार्यक्रमाला अनेक नागरिकांनी दर्शवली उपस्थिती





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

साखरा जिल्हा परिषद गट व हत्ता जिल्हा परिषद गट.मधील हत्ता गण बूथ प्रमुख व सशक्तीकरण भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे,यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.यावेळी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी बूथ सशक्तीकरण,मन की बात,धन्यवाद मोदीजी,सरल प,फ्रेंड्स ऑफ बीजेपी व आगामी कार्यक्रम यांसारख्या विविध प्रकारच्या विषयांवर चर्चा व काही समस्या जाणून घेतल्या असून त्यावर मार्गदर्शन करण्यात आले यावेळी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे सोबत तालुकाध्यक्ष हिंमतराव राठोड, मा.जिल्हा परिषद सदस्य विठलराव घोगरे, माजी पंचायत समिती सभापती संतोषराव खोडके, सर्कल अध्यक्ष पुरुषोत्तम गडदे , विजय धाकतोडे पाटील, लक्ष्मण थोरात, श्यामभाऊ देशमुख, विजय डोखळे पाटील, विवेकानंद तांबिले पाटील ,जानार्दन कोरडे, नारायण कोटकर, श्रीरंग राठोड, विधानसभा विस्तारक मुंजाळजी यांच्या सह मोठ्या संख्येने पदाधिकारी,बूथ प्रमुख,शक्ती केंद्र प्रमुख उपस्थित होते.

# श्रीगोंदा: नेक्सा महालक्ष्मीच्या वतीने ५१ आदर्श शिक्षकांचा सन्मान सोहळा मोठ्या थाटात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीगोंदा शहरातील अनन्या हॉटेल येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधत तालुक्यातील शिक्षकांचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला. सदर सन्मान सोहळा महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रायव्हेट लिमिटेड/मारुती सुझुकी डीलर यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात ५१ शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सत्यजित मच्छिंद्र, विस्तार अधिकारी नीलकंठ बोरुडे, उत्तरेश्वर मोहोळकर, दत्तात्रय शिंदे, बबन गाडेकर, सचिन हिंगणे व तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते. तसेच भाजपचे युवा नेते विक्रम दादा पाचपुते, बापूशेठ गोरे, संतोष क्षिरसागर यांनी देखील या कार्यक्रमात हजेरी लावली. नेक्सा महालक्ष्मीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात सत्यजित मच्छिंद्र, नीलकंठ बोरुडे, उत्तरेश्वर मोहोळकर, बबन गाडेकर, विक्रम दादा पाचपुते, झेंडे मॅडम आणि नेक्सा शोरूमचे मॅनेजर गणेश शिंदे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या प्रसंगी उपस्थित शिक्षकांचा शाल, सन्मान चिन्ह व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सचिन हिंगणे उपस्थित होते तर गीता सूर्यवंशी यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

महालक्ष्मी ऑटोमोटिव्हस प्रायव्हेट लिमिटेड आणि नेक्सा महालक्ष्मीच्या वतीने असिस्टंट सेल मॅनेजर सचिन हिंगणे, एसआरएम गणेश शिंदे, एसआरएम महेश देशपांडे, क्षितिज शितोळे, अय्याज शेख, रवी शिंदे, अक्षय चव्हाण, तुषार दुर्गुडे, नूतन महानवर, प्रीती जगताप आणि सचिन जंगले हे उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी सत्यजित मच्छिंद्र यांनी आपल्या भाषणात कंपनीला शुभेच्छा देतानाच, कंपनीने उडठ फंडाचा वापर करून दुर्लक्षित आणि वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचनाही केली.युवा नेते विक्रम दादा पाचपुते यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत सन्मानित शिक्षकांचे अभिनंदन केले व नेक्सा महालक्ष्मीचे आभार मानले. त्यांनी श्रीगोंदा तालुक्याच्या गेल्या १५ वर्षातील प्रगतीचा उल्लेख करत विकास कामे, रस्ते, वीज आणि विविध योजनांच्या माध्यमातून झालेल्या बदलांची माहिती दिली आणि नेक्सा महालक्ष्मीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी झेंडे मॅडम यांनी सर्व शिक्षकांच्या वतीने नेक्सा महालक्ष्मी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे तर नेक्सा महालक्ष्मीच्या वतीने एस आर एम गणेश शिंदे यांनी उपस्थित शिक्षकांचे व मान्यवरांचे आभार मानले.

## अ.श्यामसुंदर शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवत उमरा सर्कल मधील शेकडो कार्यकर्त्यांचा शेकाप मध्ये जाहीर प्रवेश

### उमरा सर्कल च्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कट्टीबद्ध आशाताई शिंदे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष विकासाभिमुख आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या नांदेड येथील स्मेरा निवास्थानी लोहा तालुक्यातील मौजे उमरा सर्कल मथील माजी सरपंच आनंदराव वाघमारे ,पोलीस पाटील बाबाराव पा.सिरसाट मुकदम ,विनायक पां.सिरसाट,ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील ,मुबीन शेख ग्रा.पं.सदस्य,दिनाजी गवाले, बालाजी पा.शिंदे, शैलेश पा.शिरसाट, विकास पा.शिंदे, सोपान पा.वडजे,माधव पा.सिरसाट,किरण पा.सिरसाट, गंगाधर पवार, शंकर पा.बोडके, लक्ष्मण शिरसाट,किशन सिरसाट, ज्ञानेश्वर पा.सिरसाट, बालाजी पा.भरकडे,मनोहर पा.शिरसाट, सुरेश पा.सिरसाट, आनंदा पांचाळ,आनंद वरपडे, रावसाहेब पा. शिंदे,शंकर पा.ढगे,मारोती पा.पवळे,वाजीद पठाण,गौतम सोनटक्के, भिमराव पटेकर,बाबु वाघमारे,दिपक पटेकर, सुनिल निलपत्रेवार, शेषेराव जोगदंड यांनी आमदार श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांच्या विकासाभिमुख कार्यावर व खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून काल दि. ६ सप्टेंबर रोजी सौ.आशाताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.सौ.आशाताई शिंदे यांनी यावेळी पक्षप्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे शाल पुष्पहार देऊन सत्कार करून सर्वांना पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी शेकाप च्या महाराष्ट्र महिला प्रदेशअध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्त्यां आशाताई शिंदे बोलताना म्हणाल्या कि आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून लोहा कंधार मतदार संघात अनेक मूलभूत विकास कामे पूर्ण झाले असून उमरा सर्कल मध्ये ही अनेक विकास कामे झाली असून आमदार शिंदे यांच्या खंबीर नेत्रत्वावर व विकासाभिमुख कार्यावर विश्वास ठेवून आज उमरा सर्कल मधील अनेक कार्यकर्त्यांनी शेकाप मध्ये जाहीर प्रवेश केला आहे, आमदार शिंदे व मी यापुढेही उमरा सर्कल च्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कट्टीबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आशाताई शिंदे यांनी दिली, तालुक्यातील उमारा सर्कल मधील शेकडो कार्यकर्त्यांनी सवय्फूर्तीने आमदार श्यामसुंदर शिंदे, आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या विकासाभिमुख खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकाप मध्ये जाहीर प्रवेश केल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत आमदार शिंदे कुटुंबियांचे पारडे जड झाले आहे,याप्रसंगी खरेदी विक्री संघांचे सभापती स्वप्निल पा,उमरेकर,धनज चे सरपंच पंजाबराव पा.माळेगावे, सुगावचे उपसरपंच विजय पा.जाधव,साईनाथ पा.सावळे,अविनाश पाटील उमरेकर, बालाजी पा.जाधव,बालाजी पा.शिंदे सह इतर कार्यकर्ते पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# बरबडा येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीची कवळे गुरूजी यांनी केली पाहणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

बरबडा ता.नायगाव येथील शेतकऱ्यांच्या भेटीला मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी तेथे जाऊन त्यांच्या झालेल्या शेतीतील नुकसानाची पाहणी केली व ग्रामपंचायत कार्यालय बरबडा येथे बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या आणि नायगाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानी बद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , पालकमंत्री गिरीश महाजन, नांदेड जिल्ह्याचे नेतृत्व अशोकरावजी चव्हाण यांना ई-मेल द्वारे तात्काळ १००%आर्थिक मदत करण्याचे त्यांनी शासनाकडे मागणी करत आवाहन केले आहे.शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला आणि ओला दुष्काळ जाहीर करून शंभर टक्के नुकसान भरपाई देण्याची मागणी शासनाकडे केली असल्याचे त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले आहे.लवकरच नुकसान भरपाई देण्यात येईल असे ही त्यांनी शेतकऱ्यांना शेतीची पाहणी करतेवेळी सांगितले आहे.

# श्री संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर येथे शिक्षक दिन उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

केज शहरातील संस्काराचे सुंदर मंदिर असलेली नामांकित शाळा म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर. येथे पाठ्यपुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बालमनावर संस्कार केले जातात. ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे सचिव श्री दादासाहेब कराड हे प्रमुख मार्गदर्शक तर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ आरती ताई कराड अध्यक्षस्थानी होत्या. शिक्षक कसा असावा, शिक्षक हा देशाच्या विकासातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. एक शिक्षक कित्येक पिढ्या घडवितो. म्हणून समाजाने सुद्धा शिक्षकांचा आदर केला पाहिजे. असे सांगून डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्याविषयी विस्तृत माहिती श्री दादासाहेब कराड यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून सुद्धा डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे चरित्र कथन झाले. अध्यक्षीय मार्गदर्शन सौ कराड मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षका व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.



# सुनिलबापु मोरे यांनी अत्यंत निष्ठेने,इमानदारीने,कर्तव्य दक्षतेने शासकीय सेवा केली–गटविकास अधिकारी सानप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी येथील जि.प.बांधकाम उपविभागाचे उपअभियंता सुनिल बापु मोरे यांची नियत वयोमानानुसार सेवापूर्ती झाली आहे.उपअभियंता सुनिल बापु मोरे यांनी अत्यंत निष्ठेने,इमानदारीने,कर्तव्य दक्षतेने शासकीय सेवा केली असल्याचे प्रतिपादन आष्टीचे गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी केले.आष्टी येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाचे उपअभियंता सुनिलबापु मोरे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानवरुन बोलत होते.यावेळी माजी उपसभापती देवीदास धस,उध्द्व बापु दरेकर,राजेंद्र धोंडे,अशोक साळवे,पी.ई.तळेकर,पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,माजी नगरसेवक दिपक निकाळजे,उपअभियंता सुनिल कुलकर्णी,सेवानिवृत्त मुख्याध्यापक आप्पाराव मोरे, भाऊसाहेब गाडे,नागेश कांबळे सर,मधुकरमामा लोखंडे,चेअरमन बेग,रोहित सायकड,सुभाष धोंडे,दादा घोडके,संपतराव धोंडे,रुपेश निकाळजे,चिंतामण निकाळजे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना देविदास धस,उध्दवबापु दरेकर,राजेंद्र धोंडे,प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,सेवानिवृत्त उपअभियंता पी.ई.तळेकर आप्पा यांनी आपल्या भाषणातुन उपअभियंता सुनीलबापू मोरे आज शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. शासकीय सेवा म्हटले की, सेवानिवृत्ती ही आलीच... शासकीय कामाऐवजी आता सामाजिक काम करण्याची त्यांना संधी प्राप्त झाली आहे. उपअभियंता सुनीलबापू यांचे वय शासकीय सेवानिवृत्ती इतके झाले असले तरी त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांचे वय इतके असावे असे वाटत नाही.मोरे कुटुंबीयांचा आमच्या संबंध गेली ४० वर्षापासूनचा आहे.

आप्पाराव मोरे यांचे अत्यंत चांगले संस्कार त्यांच्या मुलांमध्ये आलेले असल्यामुळे सुनीलबापू यांनी देखील त्यांच्याच पावलावर पार ठेवून अत्यंत निष्ठेने, इमानदारीने आणि कर्तव्य दक्षतेने शासकीय सेवा केलेली आहे.ही सेवा देत असताना मोरे यांनी कोणालाही दुखावलेले नाही आणि कोणासमोर झुकलेले देखील नाहीत.सतत चांगले विचार डोक्यात ठेवल्यामुळे ते आपल्या



कर्तव्यामध्ये यशस्वी झालेले आहेत.त्यांनी यापुढे आता स्वतंत्र भारताचे स्वतंत्र नागरिक या नात्याने मुक्तपणे सामाजिक कार्यामध्ये सहभाग नोंदवावा कारण त्यांच्यासारख्या सुशील संस्कारात वाढलेल्या व्यक्तींनी समाजासाठी काही वेळ काढावा कारण त्यांच्यासारख्या संस्काराची आज समाजाला निश्चितपणे आवश्यकता आहे. त्यामुळे सुनीलबापू मोरे यांचे पुढील आयुष्य अत्यंत आरोग्यदायी,आनंददायक आणि शांततापूर्ण वातावरणात जावोत.. त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

सुनीलबापू मोरे आज शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. शासकीय सेवा म्हटले की, सेवानिवृत्ती ही आलीच म्हणजे शासकीय कामाऐवजी आता सामाजिक काम करण्याची त्यांना संधी प्राप्त झाली आहे. सुनीलबापू यांचे वय शासकीय सेवानिवृत्ती इतके झाले असले तरी त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांचे वय इतके असावे असे वाटत नाही.मोरे कुटुंबीयांचा आणि आमचा संबंध गेली ४० वर्षापासूनचा आहे.मोरेमामांचे अत्यंत चांगले संस्कार त्यांच्या मुलांमध्ये आलेले असल्यामुळे सुनील बापू यांनी देखील त्यांच्याच पावलावर पार ठेवून अत्यंत निष्ठेने,इमानदारीने,आणि कर्तव्य दक्षतेने शासकीय सेवा केलेली आहे ही सेवा देत असताना त्यांनी कोणालाही दुखावलेले नाही आणि कोणासमोर झुकलेले देखील नाहीत.सतत चांगले विचार डोक्यात ठेवल्यामुळे ते आपल्या कर्तव्यामध्ये यशस्वी झालेले आहेत..त्यांनी यापुढे आता स्वतंत्र भारताचे स्वतंत्र नागरिक या नात्याने मुक्तपणे सामाजिक कार्यामध्ये सहभाग नोंदवावा कारण त्यांच्यासारख्या सुशील संस्कारात वाढलेल्या व्यक्तींनी समाजासाठी काही वेळ काढावा कारण त्यांच्यासारख्या संस्काराची आज समाजाला निश्चितपणे आवश्यकता आहे.त्यामुळे सुनील बापू मोरे यांचे पुढील आयुष्य अत्यंत आरोग्यदायी,आनंददायक आणि शांततापूर्ण वातावरणात जावोत..त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांना या निमित्तानं कुटुंबीयंतर्फे अत्यंत मनःपूर्वक शुभेच्छा.यावेळी उत्तम बोडखे, माजी उपसभापती देवीदास धस,उध्दवबापु दरेकर,राजेंद्र धोंडे,अशोक साळवे,सेवानिवृत्त उपअभियंता पी.ई.तळेकर,नगरसेवक दिपक निकाळजे,उपअभियंता सुनिल कुलकर्णी ,देविदास आबा धस,गटविकास अधिकारि सचिन सानप यांची भाषणे झाली.

# अहमदनगर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी आष्टीचे अनिल लगड यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



आष्टी तालुक्यातील हिवरा गावचे सुपुत्र ज्येष्ठ पत्रकार व अहमदनगर दैनिक सकाळचे अनिल लगड यांची अहमदनगर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली.अत्यंत चुरशीने व खेळीमेळीच्या वातावरणात गुरुवारी पार पडलेल्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट (पीपीएफ) पॅनलचे १७ पैकी १४ उमेदवार निवडून आले. तर डेमॉक्रॅटिक मीडिया फ्रंटचे (डीएमएफ) तीन उमेदवार निवडून आले.सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील यांनी निवडणूक अधिकारी म्हणून चोख काम बजावले. अनिल लगड हे गेल्या ३८ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत.त्यांनी लोकमत, लोकयुग,सार्वमतमध्ये संपादकीय विभागात विविध पदावर आष्टी, अहमदनगर, बीड, श्रीरामपूर, कोपरगाव, छत्रपती संभाजीनगर येथे काम केले.सध्या ते अहमदनगर येथे सकाळमध्ये कार्यरत आहेत. नवनिर्वाचीत अध्यक्ष अनिल लगड यांचे आष्टी तालुक्यातील सर्व पत्रकारांनी अभिनंदन केले.

# सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलमध्ये संपन्न झाला यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

आज लोणार शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल ची विद्यार्थ्यांनी साक्षी संजय चव्हाण हिची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजी नगर, अपूर्वा राजेश नागरे -शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे, वैष्णवी संतोष आडे-शासकीय वैद्यकीय



महाविद्यालय, अंबेजोगाई तर पल्लवी दिनकर दराडे हि रत्नागिरी येथील वैद्यकीय महाविद्यालय निवड झाली असून जितेश रामेश्वर फंगाळ याची डठझऋ पोलीससाठी निवड झालेली आहे. त्यासोबतच वैभव अंबादास इंगळे हा हिंगोली पोलीस मध्ये रूजू झालेला आहे. याचबरोबर अमित श्याम सोनुने व सुमित श्याम सोनुने या जुळ्या भावंडानी आपल्या मेहनती च्या जोरावर जलसिंचन विभागात एक कोल्हापूर तर दुसरा वाशीम जिल्ह्यात नोकरी मिळवली आहे. म्हणूनच शाळेने या सर्वांच्या प्रती आत्मियता दाखवून त्यांची मेहनत सार्थ ठरावी, व त्यांचा दखल घेऊन,तोआदर्श शाळेच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा व योग्य दिशेने वाटचाल करावी या उद्देशाने शाळेचे मुख्याध्यापक श्री. रामेश्वर डोळे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचा योग्य तो सत्कार करुन त्यांचा सन्मान केला.त्यांच्या हातुन लोकसेवा, देशसेवा घडावी या शुभेच्छा देण्यात आल्या .

# हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेत इको फ्रेंडली गणपती बनवणे कार्यशाळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेत कार्यानुभव विषय अंतर्गत एकदिवसीय इको फ्रेंडली गणपती बनवणे ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे मार्गदर्शक विठ्ठल हिमगिरे होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री महादप्पा मठपती सर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षिका लक्ष्मीकांता बिंगेवार श्री चंद्रशेखर आस्वार पालक व पत्रकार सिद्धेश्वर आप्पा मठपती, लालजी इमनेलू व पत्रकार नागनाथ पाटील माळगे यांची उपस्थिती होती. सर्व शिक्षक शिक्षक भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव लक्ष्मण यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल नरवाडे सर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ते शिक्षिका सौ. सविता नोरलावर मॅडम सौ.अश्विनी मॅडम, श्री लक्ष्मण जाधव सर श्री राजेश्वर सिदुलवार सर श्री विठ्ठल नरवाडे सर श्री रवीकुमार राठोड सर श्री विनायक बारदवार सर श्री हनुमंतराव शिंदे सर श्री



पांडरंग मामा आधी सर्व शिक्षकांना कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले . सदरील कार्यक्रमाचे फलक लेखन प्रणिता प्यादेकर मॅडम यांनी केले. काल झालेल्या शिक्षक दिनानिमित्त होतकरू विद्यार्थ्यास हिमगिरे सरानी गणवेश दिले.

सर्वप्रथम उपक्रमशील व कलाशिक्षक मार्गदर्शक विठ्ठल हिमगिरे सर यांनी मुलांना मातीच्या पासून गणपती कसा तयार करावा हे प्रात्यक्षिक दाखवले . त्यानंतर गणपतीच्या विविध आकारांची कल्पना मुलांना दिली त्यानंतर मुलांनी स्वतःहून विविध आकाराच्या माती पासून सुंदर गणपती मूर्ती बनवले मुलांना गणपती विषयी प्रचंड आकर्षण असल्याने मुले आपल्या भाव विश्वात रमून गेले होते. सदरील कार्यशाळेत चारशे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभाग नोंदवून हा कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमातून कार्यशाळेत मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. मुले आनंदाने सहभागी झाले. प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक यांनी केले व मुलांचे कौतुक केले. सर्वात शेवटी वेद न्यूज मार्फत कलाशिक्षक हिमगिरे सर मुख्याध्यापक मठपती सर व विद्यार्थ्यांची मनोगत घेण्यात आले.

# भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौरा

## शेतकरी व सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे–प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

मराठवाड्यामध्ये गेल्या काही दिवसात पावसाने थैमान घातल्याने काढणीस आलेली खरिपाची पिके पाण्याखाली गेल्याने बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सरकार शेतकऱ्यांना धीर देत नसल्याने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून धीर देण्यासाठी भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेतकरी आणि सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश दादा खोटे यांनी दि. ७ रोजी माध्यमांशी बोलताना केले आहे.

गेल्या काही दिवसापासून मराठवाडा अतिवृष्टी पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे काढणीस आलेली पिके हातची गेल्याने शेतकरी उध्वस्त



झाला आहे.त्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दुष्काळामुळे मराठवाड्यामध्ये वर्षांनुवर्षे भीषण पाणी टंचाई निर्माण होत असते पण या भागात सध्या ओला दुष्काळ पडला असल्याने शेतकरी परत एकदा हातबल झाला आहे याची पाहणी करण्याकरता परभणी येथून दिनांक ९ पासून स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे भोसले,प्रहार पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी,भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नारायण अंकुशे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश खोटे यांनी दिली आहे. हा दौरा पुढीलप्रमाणे असणार आहे.स.०८:३० : उंचाडा, ता. हदगाव स. ०९:०० : मारलेगाव स. ०९:३० : धानोरा स.१०:०० : स्वराज्य जनसंपर्क कार्यालय, हदगाव येथे नांदेड भागासाठी पत्रकार परिषद सर्व नेत्यांचा एकत्रित पाहणी दौरा परभणी दु. १२:०० : परभणी विश्रामगृह दु. ०१:०० : मौजे वझुर या गावी नुकसान पाहणी शेतकऱ्यांशी संवाद व परभणी कडे रवाना दु: ०४ : परभणी विश्रामगृह येथे पत्रकार परिषद होणार आहे.

# स्मशानभूमीत केली स्वच्छता, युवकांनी केले श्रमदान;स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

वालसावंगी । कौतिक हिवाळे

वालसावंगी काल पासून पवित्र गणेशोत्सवास सुरुवात झाली आहे.सगळीकडे यानिमित्ताने उत्साह शिगेला पोहचला असून यानिमित्ताने येथील गणेश कोथलकर

प्रशांत कोथलकर,किशोर कोथलकर,विठ्ठल आगे या तरुणांनी स्तुत्य उपक्रम राबविला असून त्यांनी येथील बारी समाज स्मशानभूमीत स्वछता करून श्रमदान केले आहे.या युवकांनी थेट स्मशानभूमीत स्वछता मोहीम राबवली असून यानिमित्ताने त्यांनी परिसराची स्वछता करून अस्तव्यस्त वाढलेल्या झाडाची छाटणी केली शिवाय काटेरी झाडे, वनस्पती काढून टाकली आहे.यामुळे परिसर स्वच्छ झाला आहे.येथील बारी समाज स्मशानभूमीत युवकांनी



अनेक वर्षे श्रमदान करून स्मशानभूमीत नंदनवन फुलवले आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रातील मान्यवर, शासकीय अधिकारी यांनी भेट देत कौतुक केले असून जालना जिल्ह्यातील आदर्श स्मशानभूमी म्हणून येथील बारी समाज स्मशानभूमीचे नाव आहे.याशिवाय येथील स्मशानभूमीत झाडांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करणे,वाढदिवस साजरे करणे,धुलीवंदन साजरे करणे,दिवाळी निमित्त दीपोत्सव साजरे करणे यासह विविध उपक्रम राबविण्यात येतात.शिवाय या ठिकाणी शेकडो विविध प्रकारची झाडे, फुलझाडे,पाण्याचा जलकुंभ,बसण्यासाठी आसन बाक यासह अनेक बाबी असल्याने येथील स्मशानभूमी आदर्श ठरत आहे.त्यात आता या युवकांच्या श्रमदानाची भर पडली असून समितीच्या वतीने युवकांचे आभार मानले आहे.या वेळी समितीचे किशोरकुमार फुसे,राजू कोथलकर,विशाल असवार,मनीष बोडखे,संजय कोथलकर यासह ग्रामस्थ प्रकाश पवार उपस्थित होते.



श्री अष्टविनायक गणेश मंडळ श्री शिवाजी शिक्षक कॉलनी लोणार सरोवर

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904